# भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी

## वाहन विभाग

दिनांक :-१७/१०/२०२५

प्रति,
संगणक विभाग प्रमुख
भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी.

**विषय :- मनपाचे मैला सफाई चे वाहन क्र. एमएच-०४-एचवाय-६२४२ (जेटींग मशिन) (टाटा ११०९ मॉडेल सन २०१७) ची दुरुस्ती करणे बाबतची कोटेशन नोटीस मनपा संकेतस्थळावर प्रसिद्ध करणे बाबत.**

**महोदय,**

उपरोक्त विषयांन्वये मनपाचे मैला सफाई चे वाहन क्र. एमएच-०४-एचवाय-६२४२ (जेटींग मशिन) (टाटा ११०९ मॉडेल सन २०१७) ची दुरुस्ती करणे बाबतची कोटेशन नोटीस मनपा संकेतस्थळावर प्रसिद्ध करावी ही विनंती.

Choudhari

**उप अभियंता (यांत्रिकी)**
**तथा वाहन विभाग प्रमुख**
**भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका**

**भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी**

दिनांक :-१७/१०/२५

**कोटेशन नोटीस**

भिवंडी निजामपूर शहर महापालिकेच्या वाहन विभागात खालील कामाची कोटेशन दि.२७ /१०/२०२५ रोजी दुपारी १.०० वाजेपर्यंत मागविणेत येत आहेत. कामाबाबतची संपुर्ण माहिती वाहन व्यवस्थापक, वाहन विभाग यांचे कडून घेऊनच कोटेशन भरावीत मागाहुन कोणत्याही प्रकारची तक्रार विचारात घेतली जाणार नाही. तसेच कोटेशन भरताना सर्व करांसहित व खर्चासहित भरावीत. मागाहून कोणत्याही कारणास्तव जास्त मागणीचा विचार केला जाणार नाही. कमी किंवा जास्त दराची कोटेशन नाकारणेचा आधिकार खालील सही करणार यांनी राखुन ठेवलेला आहे. उशिरा आणलेली कोटेशन कोणत्याही कारणास्तव स्विकारली जाणार नाहीत. तसेच कोटेशन सादर करताना सोबत पॅन क्रमांक, वस्तु व सेवा कर नोंदणी क्रमांक, संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र, व्यवसाय कर सादर करणे बंधनकारक आहे.

**मनपाचे मैला सफाई चे वाहन क्र. एमएच-०४-एचवाय-६२४२ (जेटींग मशिन) (टाटा ११०९ मॉडेल सन २०१७) ची दुरुस्ती :-**

**वाहन चालक केबिनची दुरुस्ती :-** दुरुस्ती कामी वाहन चालक कॅबिनचा पुढचा जुना बंफर काढून त्या जागी नवीन बंफर फिटिंग व वेल्डिंग करणे. तसेच दोन्ही बाजूचे टायर कडील मडफ्लॅप फिटींग करणे. तसेच दरवाजाचे लॉक जुने काढून त्या जागी नवीन हॅंडल व काच ब्लेंडर व हॅंडल फिट करुन पूर्ण दुरुस्ती करणे. **कुशन वर्क्स दुरुस्ती :-** वाहनचालक कॅबिन मधील वाहनचालक आणि क्लीनरच्या सीटचा जुना खराब झालेला रेग्झीन आणि फॉर्म काढून त्या जागी नवीन चांगला डेनसिटी चा फॉर्म आणि रेग्झीन कपडा फिट करणे. तसेच सदर वाहनचालक कॅबिनला वरच्या बाजूला आतल्या साईड मध्ये नवीन रुफला फोन व रेग्झीन कपडा फिट करणे. तसेच दोन्ही दरवाजेचे आतील बाजूस ५mm प्लॅटवुड वर रेग्झीन कपडा फिट करुन दुरुस्ती करणे. **कलरची दुरुस्ती :** सदर वाहनाचे सर्व टीन वर्क्स करुन वाहन पूर्ण चेक करुन पाण्याने पुन्हा सर्विसिंग करुन सदर वाहनाला पॉलिश पेपरने व्यवस्थित घासणे. ज्या ठिकाणी गरज आहे त्या ठिकाणी कारपेज भरुन घासणे. नंतर पूर्ण बॉडीस लांबी भरुन पूर्णपणे लांबी वाळवून पॉलिश पेपरने लेव्हल पर्यंत घासणे. कलर चे ३ वेळा लेअर लेवून गाडी कलर करणे व नंतर कॅबिनला पॉलिश करणे. चेसिसला डेमाटोन कलर मारणे. सदर वाहनावर मनपाचे नाव, गाडीचे नंबर, स्लोगन लिहून, आरटीओ नियमानुसार ३ कलर मध्ये रेडियम लावून दुरुस्ती करणे. **पाण्याची टाकी, मडगार्ड तसेच सेफ्टी गार्डची दुरुस्ती :-** सदर वाहनावरील पाण्याची टाकीची थिकनेस चेक करुन टाकीचे सपोर्ट तसेच सपोर्ट प्लेट चेक करुन त्या ठिकाणी खराब झाली आहे त्या ठिकाणी ग्रायडिंग ने घासून तसेच गॅस कटरने कट करुन नवीन सीट वेल्डिंग करुन ग्रायडिंग करणे. टाकीचे फाऊंडेशनचे सर्व नट बोल्ट नवीन फिटिंग करुन चेसीस व रॅपटरचे युक्लॅप नवीन फिटिंग करणे. पाण्याची टाकी मधील इलनेटची दुरुस्ती, तसेच टाकी ते पंप ची लोखंडी पाईप वॉल्व सहित नवीन फिट करणे. तसेच सदर वाहनाला उजवी व डावी बाजू तसेच मागील बाजूचे तुटलेले सर्व गार्ड जुने कट करुन RTO नियमानुसार नवीन गार्ड फिटिंग व वेल्डिंग करणे. तसेच मागील दोन्ही बाजूचे मडगार्ड जुने काढून नवीन मडगार्ड सपोर्ट सहित वेल्डिंग व फिटिंग करणे. **लाईट व हॉर्नची दुरुस्ती :-** सदर वाहनाचे सर्व लाईट व्यवस्थित सुरु करुन सर्व स्विच, मिरर, लाईट चेक करुन खराब झालेले टेललाईट व सिग्नल लाईट नवीन फिटिंग करुन दुरुस्ती करावी लागेल. तसेच सदर वाहनाचा हॉर्न खराब झाला आहे तरी जुना हॉर्न काढून त्या जागी नवीन १२VDC = ०२ नग हॉर्न व स्विच व कट आउट फिट करुन दुरुस्ती करणे. **डिझेल टाकीची दुरुस्ती :-** सदर वाहनाची डिझेल टाकी जास्त प्रमाणात लिकेज आहे तसेच टाकीचे ब्रॅकेट आणि पट्टी सुद्धा तुटली आहे. तरी दुरुस्ती कामी डिझेल टाकीचे दोन्ही पाईप काढून डिझेल टाकी व पट्टी आणि ब्रॅकेट काढणे. नवीन डिझेल टाकी, ब्रॅकेट व पट्टी फिट करुन पुन्हा डिझेल पाईप फिटिंग करुन Air काढून सदर वाहन सुरु करणे. स्पिड गव्हर्नर फिट करणे :- सदर वाहनास स्पीड गव्हर्नर फिट करणे व स्पीड गव्हर्नर फिट केले बाबतचा दाखला प्राप्त करणे.

**उप अभियंता (यांत्रिकी)**
**तथा वाहन विभाग प्रमुख**
**भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका**

दिनांक १७/१०/२०२५
खालील ठिकाणी प्रसिद्ध केली.
१) मनपा संकेतस्थळ